

# आरोग्य प्रशासन व एड्स जनजागृती



प्रा.डॉ.नागेंद्र कि.कांबळे
प्रा.डॉ.बी.आर.कत्तुरवार

# राष्ट्रीय महापुरूष, समाजसुधारक आणि विचारवंतांच्या विचारप्रणालीचा संशोधनात्मक वेध

: संपादक :
प्रा. डॉ. उलगडे लक्ष्मण काशिनाथ



सुमन प्रकाशन, लातूर

प्रकाशन क्र. ३३

**राष्ट्रीय महापुरूष, समाजसुधारक आणि**
**विचारवंतांच्या विचारप्रणालीचा संशोधनात्मक वेध**
**संपादक : प्रा. डॉ. उलगडे लक्ष्मण काशिनाथ**
**National Great Men, Socialite and Thinkers : Research study of Ideology**
**Author** - Dr. Ulgade Laxman Kashinath

**ISBN 978-93-89517-22-4**

**सुमन प्रकाशन**
३०४, विंग-सी, सिद्धिविनायक अपार्टमेंट,
सुतमील रोड, लातूर
मो. ८६००८८११२७

© सर्व हक्क
**लेखकाधिन**

प्रथम आवृत्ती
**डिसेंबर २०१९**

मुद्रक
**आर्टी ऑफसेट, लातूर**

अक्षर जुळवणी
**रोहित टायपिंग सेंटर, लातूर**

मुखपृष्ठ रेखाटन
**विरभद्र गुळवे**

₹ - २००/-

*"राष्ट्रीय महापुरूष, समाजसुधारक आणि विचारवंतांच्या विचारप्रणालीचा संशोधनात्मक वेध" या पुस्तकातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकाची असून त्या संबंधी प्रकाशन, संपादक, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नव्हे.

१५. बुद्धतत्त्वज्ञानाची मुख्य आधारतत्त्वे व सुरक्षा ............ ६६
**डॉ. बालाजी मा. गव्हाळे**
१६. भगवान बुध्दांची विचार प्रणाली आणि कार्य : एक अभ्यास ............ ७२
**डॉ.राखी सिद्राम सलगर**
१७. पंडित नेहरूंचे ऐतिहासिक समाजवाद आणि नियोजन ............ ७७
**प्रा.डॉ. बब्रुवान मोरे**
१८. ह.भ.प.श्री चन्द्रशेखर महाराज देगलूरकर : एक परिचय ............ ७९
**डॉ.संजिवनी श्रीपाद नेरकर**
१९. पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन : जीवन व कार्य ............ ८५
**डॉ. जगदीश नरहरराव कुलकर्णी**
२०. अभंग भक्ती आणि संगीत ............ ८९
**मानसी सरदेशपांडे**
२१. शिवरायांचे लोककल्याणकारी प्रशासन ............ ९३
**डॉ.बी.आर.कतूरवार**
२२. पंडित जवाहरलाल नेहरु यांची विविध विचारप्रणाली एक अभ्यास ............ ९७
**प्रा. डॉ. मुळे कांचन खुशालराव**
२३. हिंदी कहानियों में वृध्दावस्था ............ १००
**प्रा.डॉ.एम.डी.इंगोले**
२४. मानवता के पुंज गुरु नानक देव ............ १०६
**डॉ.पुष्पा गोविंदराव गायकवाड**
२५. हिंदी कहानियों में मुस्लिम समाज-दुर्दशा ............ १०९
**प्रा.डॉ.एम.डी.इंगोले**
26. Gandhian Economic Thought And Its Relevance To New Economic Policy In 21st Century ............ 113
**Dr. Jaisheela. B**
27. Gandhi's Views On Satyagraha And Non -Violence ............ 121
**Koppolu Saideepti**
28. Mahatma Basaveshwara the great socio religious reformer ............ 124
**Lulle Anjali Manik**
29. Relevance of Gandhian Thoughts in Modern India ............ 127
**Dr. Sudhir Prakashrao Dinde**
30. Role of Raja Ram Mohan Roy in Social Reforms ............ 130
**Naresh Kumar**

# २१.
# शिवरायांचे लोककल्याणकारी प्रशासन

**डॉ.बी.आर.कतूरवार**
देगलूर महाविद्यालय, देगलूर

**प्रस्तावना :-**

या भारत भूमिने जगाला अनेक महापुरुष दिलेले आहेत.ज्यांनी जगावरच नव्हे तर जनतेच्या ऱ्हदयावर राज्य केलेले आहे. अशा महापुरुषापैंकी एक म्हणजे हिंदवी स्वराज्य संस्थापक,क्षत्रिय कुलावतंस, महाधुरंधर, तेजप्रताप, पुरंदर, जाणता राजा,श्रीमान योगी, श्रीमंत योगी...श्री छत्रपती शिवाजी महाराजहोत.

छत्रपती शिवाजी महाराजहे उत्कृष्ट प्रशासक आणि असामान्य पराक्रम गाजवणारे नेतृत्व होते.त्यांच्या नेतृत्वातील प्रशासन व्यवस्थेत विविध लोककल्याणाची कामे करतांनासामान्यातील सामान्या माणूस केंदूबिंदू माणून प्रशासन चालविले जात होते.शिवाजी महाराजहे स्वत: राजे असून, राज्यकारभार करुन देखीलते^स्थितप्रज्ञासारखे* म्हणायचे,^हेशिवाजीचे राज्ये नव्हे, तरहे माझ्या रयेतेचे राज्य आहे.* म्हणूनच रयतेने त्यांना रयतेचाराजा, जाणताराजा, लोककल्याणकारी राजा आशी वेगवेगळी उपाधि देवून त्यांचा गौरव केला. शिवरायाचे प्रशासन हे कशाप्रकारे लोककल्याणाकारीहोते.हे आपणास खालील प्रमाणेस्पष्ट करता येईल.

**१) लोककल्याणकारी राज्याचे व्यवस्थापन :-**

लोकल्याणकारी राज्यात प्रजेच्या अन्न,वस्त्र,निवारा व शिक्षण या मूलभूत व जीवनावश्यक गरजा पूर्णहोतात. स्त्रियांचा सन्मान केला जातो.सामान्या जनतेची, शेतकज्यांची फसवणूक होत नाही किंवा लूटहोतनाही.कोणवरही अन्याय अत्याचार, जबरस्ती केल्या जात नाही.प्रजेला जलद, न्याय मिळतो.शेती आणि उद्योगांचा विकास होतो.लोककला बहरु लागतात. प्रजा सुखा-समाधानाने रहाते...

**२) शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ :-**

लोककल्याणकारी प्रशासनाचे काम अधिक व्यवस्थित चालावे म्हणून शिवरायांनी राज्यकारभाराची प्रमुखअशा आठ खात्यात विभागणी केलीहोती. हेच शिवरायांचे अष्टप्रधान मंडळहोय. अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून चालवलेले प्रशासन हे खज्या अर्थाने लोककल्याणकारी राज्य होते. या प्रधानांच्या व इतर महत्तवाच्या अधिकाज्यांच्या नेमनुका ह्या त्यांची गुणवत्ता व पात्रता पाहुणच केल्या जायच्या.हे खज्या अर्थाने रयतेचे राज्य, म्हणजे प्रजेचे राज्य म्हणजे लोकांचे राज्य म्हणजेच लोकशाहीहोती. आजपासूनसाधारणत: ४०० वर्षापुर्वी शिवरायांनी लोकशाही आमलात आणली व चालवून दाखवली ही आपणासाठी अतिशय महत्तवपूर्ण बाब आहे. व प्रत्येक प्रशासकासाठी आदर्शरुप आहे.शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळाची रचना खालीलप्रमाणेहोती.

**अष्टप्रधान मंडळ**

| क्र. | प्रधानाचे नाव | पद | काम |
|---|---|---|---|
| १ | मोरो त्रिंबक पिंगळे | प्रधान | राज्यकारभार चालविणे |
| २ | रामचंद्र निळकंट मुजुमदार | अमात्य | राज्याचा जमा खर्च पाहणे |
| ३ | हंबीरराव मोहिते | सेनापती | सैन्याचे नेतृत्व करने |
| ४ | मोरेश्वर पंडितराव | पंडितराव | धर्माची कामे पाहणे |
| ५ | निराजी रावजी | न्यायाधिश | न्यायदान करणे |
| ६ | अण्णाजी दत्तो | सचिव | सरकारी अज्ञापत्रे पाठवणे |
| ७ | दत्ताजी त्रिंबक वाकणीस | मंत्री | पत्र व्यवहार सांभाळणे |
| ८ | रामचंद्र त्रिंबक डबीर | सुमंत | परराज्यांशी संबंध ठेवणे |

शिवरायांचे अष्टप्रधान मंडळहे सध्याच्या लोकशाही व्यवस्थेतील कॅबिनेट मंत्र्यासमान होते. या व्यतिरिक्त, दिवाण, मुजुमदार, जमादार, किल्लेदार, फडणवीस, सबणीस, कारखाणीक, चिटणीस, पोटणीस ई. अनेक पदे व त्यावरील अधिकाऱ्यांच्या नेमणुका शिवराय स्वत: गुणवत्ता व पात्रतेच्या आधारावर करीत असत. थोडक्यात ४०० वर्षापूर्वीच शिवरायांनी लोकशाही, कॅबिनेट मंत्री मंडळ व लोककल्याणकारी प्रशासन यांची सुरुवात केलीहोती.

**३) शिवरायांचे महसूल प्रशासन :-**

**A) रयतवारी पध्दती :-**

शिवाजी महाराजांपूर्वी महसूल गोळा करण्याचे काम जमिनदारांकडेहोते. जमिनदार वर्ग बहुतेक वेळा महसूल गोळा करीत आसतांना जनतेवर अन्याय,अत्याचार,जबरसती करीत असत. जनतेवर अन्याय अत्याचार करणारीही जमिनदारीपध्दती महाराजांनी रद्द केली. दलालांचे अधिकार काढून घेतले व आदर्श अशी रयतवारी पद्धत सुरु केली. आणि महसूल गोळा करण्यासाठी स्वत:चे(सरकारी) अधिकारी नियुक्त केले. सेवकापासून ते मंत्र्यापर्यंत सर्वांना मासिक वेतन (पगार) चालू केले. यावरुन शिरायांचे महसूल प्रशासनासंबधी लोककल्याणाकारी दृष्टिकोन दिसून येतो.

**B) शेतकऱ्याविषयीचे धोरण :-**

शिवाजी महाराजांना शेतकरी, कष्टकरी यांच्याबददल आस्था होती. त्यावेळी महाराष्ट्रामध्ये वेगवेगळया भागात वेगवेगळया सत्ता राज्य करीत होत्या. त्यात विजापूरचा आदिलशहा, अहमदनगरचा निजामशहा, दिल्लीचा मुघल बादशहा, गोव्याचा पोर्तुगीज, जंजिऱ्याचा सिध्दी या सत्ता आपला साम्राज्य विस्तार करण्यासाठी एकमेकांच्या प्रदेशावर सतत सैनिकी आक्रमण करायचे .त्यांच्यात लहान-मोठया लढाया व्हायच्या. ते ज्या भागातून जात त्याभागातील शेतकऱ्यांची पिके जाळून टाकत किंवा घोडयांच्या टापाखाली चिरडून टाकत.यात शेतकऱ्यांच अतोनात नुकसान व्हायचं .तोडांशी आलेले पिक शत्रूकडून नष्ट केल्या जायचं.तर कधी-कधी आपलेचसरदार किंवा सैनिक मोहीमवर जाताना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शेतकज्यांच नुकसान करायचे. परंतु शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्यासव अधिकाऱ्यांस अशी सक्त ताकिद दिलीहोतीकी, शेतकऱ्याच्या

मिरचिच्या देठालाहीहात लावाल तरहाथ कलम केले जातील, कुणाचीही गय केली जाणार नाही. इतकेच नसून दुष्काळी काळातशेतकऱ्यांचा शेतसारा माफ करुन त्यांना हवी ती मदतसरकारी खजीण्यातून करण्याचे आदेश दिलेहोते. यातून शिवरायांचीशेतकरी, कष्टकरी यांच्या बददलची तळमळ व प्रशासनातीललोककल्याणाकारी दृष्टिकोन दिसून येतो.

**४) जल व्यवस्थापन :-**

सद्या महाराष्ट्रसरकारने राज्याला कायमस्वरुपी दुष्काळापासून मुक्त करण्यासाठी जलयुक्त शिवार ही योजना सुरु केली आहे. यापुर्वी पाणी आडवा, पाणी जिरवा ... अशी एक योजना उपलब्ध होती. परंतु याचे मूळ आपणास शिवकालीन प्रशासनात पाहायला मिळते. शिवरायांनी स्वराज्यातील गावोगावी छोटे-छोटे बंधारे बाधुन लोकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुन दिले. तसेच या बंधाऱ्याना पाट काढून शेतीसाठी पाणी उपलब्ध करुन दिलेहोतेत्यामुळे स्वराज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढत असे. रयतेला दुष्काळाची तिव्रता जाणवत नसे यातून शिवाजी महाराजांचा दुरदृष्टीकोन व लोककल्याणकारी प्रशासनाचे दर्शन घडते.

**५) दुष्काळ निवारण व रोजगार निर्मिती :-**

शिवकालीन प्रशासनात आसमानी (नैसर्गिक) संकटांबरोबरच कधीकधीसुल्तानी (शत्रुंकडून म्हणजेचसुल्तानांकडून) संकटे यायचीत्यामुळे राज्यात दुष्काळ पडायचा. अशा दुष्काळग्रस्त काळात शिवराय शेतकऱ्यांना विविध सवलती देत असत. प्रजेलासारा माफ करत असत. सरकारी कोठारात साठवलेले धान्य रयतेला मोफत वाटून देत असत. तसेच दुष्काळाच्या वर्षी शेतकरी, कष्टकरी, कामगार, कारागिर, बलुतेदार इ. या लोकांची उपासमार होवू नये त्यांना दुष्काळाचा फटका बसून यांची कौटूंबीक, जीवत व आर्थीकहाणी होवू नये म्हणून शिवराय दुष्काळी वर्षामध्ये वेगवेगळया किल्यांवर दुरुस्तीची काम सुरु करत असत. धरणे, कालवे, बंधारे यांचीही कामे सुरु करुन शेतकरी, कष्टकरी, कामगार, बलुतेदार, कारागिर या सर्वांना रोजगार मिळवून देत असत. असा उदात्त दृष्टिकोन ठेवून चालणारे राज्य म्हणजेच शिवरायांचे कल्याणकारी प्रशासन होय. शिवराय नेहमी म्हणायचे,

श्रींचे राज्य आणणे आहे |
सर्वांना पोटासी लावणे आहे... ||

यातून शिवरायांचे लोककल्याणकारी प्रशासन दिसून येते.

**६) स्वच्छता व आरोग्य प्रशासन :-**

आज २१ व्या शतकातसंपूर्ण देशभरात स्वच्छ भारत अभियान राबवल्या जात आहेही खूप चांगली गोष्ट आहे. परंतुआजपासून४०० वर्षापुर्वी म्हणजेच १७ व्या शतकातदेखिल या देशात एक प्रशासकहोता, ज्याने लोकांच्या जिवनातील स्वच्छता व आरोग्याचा विचार त्यावेळीच केला होता तो लोककल्याणकारी प्रशासक म्हणजे श्री छत्रपतीशिवाजी महाराज होय.

घरे आणि सार्वजनिक ठिकाणे अधिकाधिक स्वच्छ कसे ठेवता येतील, या संबंधीची उपाय योजना शिवरायांनी करुन ठेवली होती, जसे की घराभोवती निरगुडीच्या झाडाचे कुंपण घालून घरामध्ये उंदीर, विंचू, किडा, मुंगी यासारखे प्राणी येणार नाहीत याची दक्षता घेतली जात असेतसेच धुर करुन धोकादायक असणारे जंतू नष्ट केल्या जात असत. गडावरील बाजारपेठेत तसेच रस्त्यावर केर कचरा राहणार नाही याची काळजी घेतल्या जात असे. जमा झालेला कचरा गडाखाली

फेकूणन देता, तो जागेवरच जाळून टाकल्या जात असे व त्यापसूनतयार झालेल्या राखेचा वापर परडयातील भाजीपाल्यासाठी खत म्हणून करण्यात येत असे.

**सारांश :-**

शिवरायांचे संपुर्ण लोककल्याणकारी प्रशासन हे एवढया कमी शब्दात मांडता येणार नाही परंतु शिवरायांच्या लोककल्याणकारी प्रशासनाचा एक अत्यंत अल्पसा परिचय करुन घेण्याचा प्रयत्न आपण या ठिकाणी केला आहे. अशाप्रकारे शिवरायांनी वेगवेगळया माध्यमातून त्यांच्यातील एक आदर्श प्रशासक, एक जाणता राजा व एक लोकत्तर लोककल्याणकारी प्रशासक स्वतःच्या आचरनातुन दाखवून दिले. जे की आज प्रत्येक राज्याच्या, देशाच्या, नव्हे नव्हे जगातील कुठल्याही प्रशासकालाहे आदर्श रुपच आहे.म्हणुनच प्रत्येक प्रशासकाला शिवरायांच्या प्रशासकीय कौशाल्याचा अभ्यास करावा वाटतो व आपल्या राज्याला लोककल्याणकारी करण्याचा मंत्र शिवरायांच्या प्रशासनातून घ्यावा वाटतो ही आपणासाठी अभिमानास्पद बाब आहे. अशा ह्या महान आदर्श प्रशासकास शतशः मानाचा मुजरा!

**संदर्भ ग्रंथ**


| | | |
|---|---|---|
| १)Administrative system of the Maratha | - | S.N. Sen . |
| २) Adminisrative system of Shivaji | - | KrdarPhalke |
| ३) Courts and Administration of Justice UnderChhatrapatiShivaji | - | T.T. Mahajan |
| ४) ShivajiThe Management Guru | - | Prof.NamdevJadhav |
| ५) MarathyancheAshtapradhanMandal | - | Ashok ShindeSarkar |
| ६) Shivchatrapati stand ४th | - | Maharashtra SBTPCR Pune. |


❋❋❋



Rajiv Gandhi Mahavidyalaya, Mudkhed & SRTM University jointly Organized


# One day Interdisciplinary National Conference on
# Contemporaneity of Gandhian Thoughts: Reality & Distortion

**1st October, 2019**


Organized By:
**Department of Political Science**
Shri Sharda Bhavan Education Society's
**Rajiv Gandhi Mahavidyalaya,**
**Mudkhed, Dist. Nanded- Maharashtra -India**



Edited by
Dr Ramesh Kadam
Dr Dattaji H. Mhetre

७५. सत्याग्रह आंदोलनात असहकाराचे महत्व-प्रा.यादव कल्याण दतात्रय २०९

७६. म. गांधी यांचे शैक्षणिक विचार-प्रा. डॉ. माधव बसवंते २११

७७. महात्मा गांधीजी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तौलनिक विचार
- प्रा. डॉ. कविता गंगाधर सोनकांबळे २१४

७८. महात्मा गांधी प्रणित सत्याग्रहींची साधने- भागवत नामदेवराव पस्तापुरे २१८

७९. महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार-श्री वृंदावन निवृत्ती नामवाडे २२०

८०. महात्मा गांधी आणी बहुराष्ट्रीय कंपन्या-सहा. प्रा. लक्ष्मण बाबाराव यादव २२४

८१. महात्मा गांधी यांचे सामाजिक व मानवतावादी विचार-विजया बळीराम डावकरे,परमेश्वर तात्याराव लामतुरे २२६

८२. महात्मा गांधीजीचे सामाजिक विचार-डॉ. रामपूरे शीला महादेव २३०

८३. महात्मा गांधी आणि ग्रामस्वराज्य - बनसोडे गंगाधर २३३

८४. मं गांधीजींचे शैक्षणिक विचार व सद्यस्थिती-प्रा.डॉ.दत्ता मा.कुंचेलवाड २३५

८५. महात्मा गांधी आणि भारतीय संविधान-प्रा. डॉ.बी.आर. कत्तुरवार २३८

८६. हिंदी साहित्य में गांधीवादी दृष्टि-डॉ.काळे लक्ष्मण तुळशीराम २४०

८७. गांधीजी के शिक्षा विषयक विचार-डॉ.ठाकूर व्ही.सी. २४२

८८. महात्मा गांधीजीके सामाजिक विचारो की प्रासंगिकता-डॉ.खेडेकर एम.यू. २४४

८९. महात्मा गांधी और प्रेमचंद-डॉ.संगीता शरणप्पा उप्पे २४६

90. Gandhian Philosophy of Democracy - Dr. Ajay Vasantrao Gavane 248

91. Gandhiji's Non-Violence Concept: A need of Global Peace - Dr. Kantrao P. Pole 251

92. Contemporary Life and Gandhian Thought - Durgesh Ravande 254

93. Understanding Hind Swaraj Through The Political Society - Anand Jayshette 257

94. Mahatma Gandhi and sustainable Development - Dr. Basweshwar Pandagale 263

95. Anthar Vidya Shakiya Rashtriya Charcha Satru 'Mahatma Gandhi Vicharancha SamaKaliNata Vastav Ani Viprayaas'-Krishnan R, Dr. Godage Dattatray Sitaram., Dr. N. Swaminathan 265

96. The Women's Empowerment ;-Mahatma Gandhi views - Dr Prashant R Kadwe 270

97. The Relevance Of Mahatma Gandhi: Satyagraha And Non-Violence-Research Scholar - Koppolu Saideepti 275

98. Gandhi's Concept of Non-Violence and Truth - Dr. Mahesh Jaiwantrao Patil 278

99. Non-Violence Concept and Mahatma Gandhi: Sociological Analysis - Dr. Bibhishan Kare 282

100. Utility Of Gandhian Thoughts In The Social Development - Dr. Sutawane Parimal Arvind 285

ISBN : 978-81-922248-8-6

# महात्मा गांधी आणि भारतीय संविधान

**(विशेष संदर्भ : ग्राम स्वराज्य)**

प्रा. डॉ.बी.आर. कत्तुरवार
लोकप्रशासन विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर

वैभवशाली भारतीय संस्कृतीचा वारसा लाभलेल्या भारत देशात अनेक महापुरुषांनी मानवतावादी विचारांची कास धरुन संपूर्ण जगाला संदेश दिला. संपूर्ण जगाला सत्य आणि अहिंसेचा संदेश देणारे महापुरुष म्हणून संपूर्ण जगभरात महात्मा गांधीचे नाव गौरवाने घेतले जाते. भारत हा खेडयांचा देश असुन खरा भारत खेडयात आहे म्हणुन खेडयाकडे चला असा संदेश महात्मा गांधीनी दिला.

भारतातील प्रत्येक खेडेगाव संपुर्ण, स्वावलंबी आणि स्वयंशासीत बनावे म्हणुन महत्मा गांधीनी ग्राम स्वराज्याची संकल्पना मांडली. इतकेच नव्हे तर भारतातील प्रत्येक खेडयाला राजकीय स्वायत्तता बहाल करावी. जेणेकरुन प्रत्येक गावी स्वयंपुर्ण राजकीय व आर्थिक घटक म्हणुन विकसीत होईल. त्यांनी आपल्या ग्रामस्वराज्य या संकल्पनेतुन प्राचीन भारतातील रामराज्य वास्तविकतेत आणता येईल. यासाठी प्रत्येक खेडेगाव आत्मनिर्भर बनावे स्वावलंबी बनावे म्हणुन विकेंद्रीत लोकशाहीचा आग्रह धरला.

भारतीय संविधान सभेने देखील महात्मा गांधीच्या विचाराला मुर्त स्वरुप देण्यासाठी लोकशाही विकेंद्रीकरणाच्या विचाराला प्राधान्य देवुन पंचायतीराज व्यवस्थेला मध्यवर्ती स्थान प्राप्त करुन दिले आहे. महात्मा गांधीचे ग्रामस्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी ग्रामीण जनतेला राजकीय भागीदारी देण्यासाठी भारतीय संविधानात अनेक महत्वपुर्ण तरतुदी करण्यात आल्या आहेत. स्वातंत्र्यपुर्व काळात कॉग्रेस पक्षाने देखील भविष्यकाळात भारतीय शासन व्यवस्थेत पंचायत राज्याचा पुरस्कार करण्यात येईल. अशी अनेक सभेतुन घोषणा केली. त्यामुळेच भारतीय संविधान सभेची निवड झाल्यानंतर व प्रजासत्ताक संसदीय लोकशाहीची स्थापना झाल्यानंतर गांधीजीच्या विचारानुसार पंचायतीराज संस्था स्थापन करण्यासाठी पुढाकार घेण्याचे नैतिक बंधन संविधान सभा कॉंग्रेस व नेहरु सरकारवर होते. महात्मा गांधीचे ग्राम स्वराज्याचे स्वप्न साकार करण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणुन त्यांच्या अनुयायांनी खेडयांच्या विकासाचे विविध उपक्रम राबविले. त्यासाठी देशातील विविध प्रांतात अनेक सेवाभावी संस्था स्थापन करण्यात आल्या.

त्यात प्रामुख्याने अखील भारतीय ग्रामोद्योग संघटना, सेवाग्राम येथील गांधी विद्यालय, तीरचुनगोडी येथील गांधी निकेतन, कालुपाटी येथील गांधीनिकेतन, पेरुर येथील गांधी सेवा सदन, त्रीचुर येथील कस्तुरबा आश्रम, अखील भारतीय विनकर संघटना वर्धा येथील सेवाग्राम, इत्यादी संस्था स्थापन करण्यात आल्या.

इ.स. 1949 मध्ये तत्कालीन मुंबई राज्यात ग्रामीण विकासासाठी सर्वोदय कार्यक्रम राबविण्यात आला. ग्रामीण भागाचा संर्वागीण विकास करण्यासाठी भारतीय संविधानातील मार्गदर्शक तथा नितीनिर्देशक तत्वामध्ये सरकार पंचायतीराज व्यवस्था स्थापन करेल व लोकशाही विकेंद्रीकरणाला प्राध्यान देईल व त्यासाठी अनेक खेडेगावात ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी सरकारने पुढकार घ्यावा. संविधानात स्थानिक शासन हा विषय भारतीय लोकशाहीचा पाया मजबुत करण्यासाठी, शासन कारभारात लोकसहभाग वाढविण्यासाठी, लोकांना लोकशाहीचे प्रशीक्षण देण्यासाठी, विकास कामात जनतेचा प्रत्यक्ष सहभाग वाढविण्यासाठी आणि स्थानीक भागातील विविध समस्या स्थानिक पातळीवर सोडविल्या जाव्यात म्हणुन लोकशाही विकेंद्रीकरणाची विविध तरतुदी भारतीय संविधानात करण्यात आले आहेत.

म.गांधी दि. 31 जुलै 1937 च्या हरिजन पत्रिकेत ते असे लिहितात की, By education, I mean un all round drawing out the best in child and man body, mind and spririt, literacy is not the end of the ducation, nor even the begining, it so only one of the means whereby, man and women can be cducated Litcracy in itself is no education याचा अर्थ शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्व क्षमतांचा विकास करणे होय. मं.गांधीना शिक्षणातून विद्यार्थ्यांचा केवळ बौध्दीक विकास नव्हे तर शारीरिक, भावनिक, नैतिक आणि क्रियात्मक विकास करणे अपेक्षित होते. ते म्हणतात True education is that which draws not and simulates the spiritual, intellectual and physical facltics of children. मं. गांधीच्या मते, विद्यार्थ्यांचे डोके म्हणजे रिकामे खोके नव्हे

 ISBN : 978-81-922248-8-6

कि जे हवे ते त्यात कोंबावे किंवा विद्यार्थी म्हणजे मातीचा गोळा नव्हे की त्याला हवा तो आकार द्यावा. विद्यार्थी जेंव्हा जन्माला येतो तेंव्हा काही समज प्रवृत्ती घेवून येतो. त्यामुळे त्याला सहप्रवृत्ती ओळखून त्याचा विकास करणे म्हणजे शिक्षण होय. त्यांच्या मते शिक्षण म्हणजे, जीवनातील उच्च मूल्ये संपादन करण्याचे साधन होय. म्हणून त्यांनी शिक्षणात साक्षरता किंवा शास्त्राच्या ज्ञानापेक्षा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला अधिक महत्व दिलेले आहे. त्यामुळे त्यांनी बालकेंद्रीत व जीवनकेंद्रीत शिक्षणाचा पुरस्कार केलेला आहे. त्यांच्या मते शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांचा हात, डोके व ह्रदयाचा विकास करणे होय. मं.गांधी म्हणतात, शिक्षणाद्वारे सत्याचे व पवित्र अंतकरणाचे दर्शन घडवावे. त्यांच्या मते Your education is absolutely worthless if it is not builit on a solid foundation of truth and purity शिक्षणाद्वारे चांगले काय आणि वाईट काय याचे ज्ञान आम्हाला होऊ शकते. म्हणून जे शिक्षण आम्हाला असे ज्ञान प्राप्त करुन देऊ शकत नाही ते शिक्षण नसून आत्मप्रतारणाच होय. व्यक्तीला रोजगाराची संधी उपलब्ध करुन देऊ शकते, विविध स्वरुपाची व्यावसायिक क्षमता प्राप्त करुन देऊ शकते तेच खरे शिक्षण होय.

सारांश :

एकविसावे शतक हे मानवाच्या उन्नतीचे व उत्कर्षाचे शतक असले तरी मानवाने केलेल्या प्रगतीला जोपर्यंत नितीचे अधिष्ठान असणार नाही तोपर्यंत केलेली उन्नती पूर्ण होवू शकत नाही. आज मानवता, माणूसकी व नैतिकता या आदर्श मानवी मुल्यांची मोठया प्रमाणात अवहेलना होत आहे. या बिकट व भोगवादी चक्रातून मानवी जीवन सुरक्षीत ठेवायचे असेल तर गांधीजीच्या पाऊलावर पाऊल टाकणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे जात्याच्या खुंटीला धरुन असणारे मुठभर दाने जात्यात भरडले जात नाहीत व त्यांचे पीठ देखील होत नाही त्याप्रमाणे एकविसाव्या शतकात ज्या व्यक्ती गांधी विचार व भगवदगीतेतील विचाराला अनुसरुन जीवन जगत आहेत. त्यांचे जीवन सुखी, समाधानी व संपन्न बनु शकते.

गांधीजीच्या विचाराप्रमाणे भारतातील प्रत्येक खेडेगाव स्वयंपूर्ण, स्वावलंबी व स्वयंशासीत बनल्यास खऱ्या अर्थाने शेतकरी आत्महत्ये सारख्या गंभीर समस्या देखील संपूष्टात येवू शकतात. अर्थात गांधीजींचे तत्वज्ञान ऐकण्यासाठी, वाचण्यासाठी, पाहण्यासाठी व चर्चा करण्यासाठी खूप आदर्श व चांगले वाटत असले तरी जोपर्यंत ते विचार प्रत्येक व्यक्तीच्या वाणी, वर्तन व विचारात दिसणार नाहीत तोपर्यंत एक महासत्ताक राष्ट्र म्हणून भारताचा उदय होणार नाही.

संदर्भ :


1. हरिजन पत्रिका, 11 सप्टेंबर 1937
2. कुंभार नागोराव (संपादीत) म.गांधी विचार दर्शन, प्रबोधन प्रकाशन लातुर.
3. माशेलकर रघुनाथ (संपा) अखंड प्रेरणा गांधी विचारांची.
4. गांधी मो.कं., माझ्या स्वप्नातील भारत, (2010) परधाम प्रकाशन वर्धा.
5. गांधी मो.क., हिंद स्वराज्य, नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद.
6. गांधी मो.क., रचनात्मक कार्यक्रम (2010) नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद.
7. गांधी मो.क., सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, (2006) नवजीवन प्रकाशन मंदिर अहदाबाद.

# राज्यशास्त्र


## इयत्ता ११वी











प्रथमावृत्ती : २०१९ © महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

## राज्यशास्त्र विषय समिती

डॉ.श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
डॉ.प्रकाश पवार, सदस्य
डॉ.मोहन खडसे, सदस्य
डॉ.अभय दातार, सदस्य
प्रा.संगीता आहेर, सदस्य
प्रा.अजिंक्य गायकवाड, सदस्य
डॉ.नीता बोकील, सदस्य
श्री.मोगल जाधव, सदस्य
वर्षा सरोदे, सदस्य-सचिव

## राज्यशास्त्र अभ्यासगट समिती

डॉ.प्रविण भागडीकर
प्रा.संगिता दीक्षित
प्रा.राजेंद्र इंगळे
प्रा.वीणा केंची
डॉ.रोहिदास मुंढे
डॉ.व्यंकटलक्ष्मी पुरणशेट्टीवार
प्रा.अरुणा खामकर
प्रा.पीतांबर उरकुडे
प्रा.दिलीप कडू
डॉ.नंदकिशोर बोकाडे
डॉ.रामदास ढगे
डॉ.बालाजी कतूरवार
डॉ.प्रभाकर लोंढे
श्री.रविंद्र जिंदे
श्री.सुभाष राठोड
श्रीमती मुग्धा महाबळ

## संयोजक

सौ. वर्षा सरोदे
साहाय्यक विशेषाधिकारी,
इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

## मुख्य समन्वयक

**सौ.प्राची रवींद्र साठे**

## लेखक

डॉ.श्रीकांत परांजपे
डॉ.प्रकाश पवार
डॉ.अभय दातार
डॉ.संहिता जोशी

## मुखपृष्ठ व सजावट

**श्री.मुकीम शेख**

## नकाशाकार

**श्री.रविकिरण जाधव**

## भाषांतरकार

प्रा.संगिता दीक्षित
श्रीमती मुग्धा महाबळ
प्रा.वीणा केंची

अक्षरजुळणी : मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे
कागद : ७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह
मुद्रणादेश : N/PB/2019-20/QTY.- 50,000
मुद्रक : M/s. Siddhivinayak Printmail, Raigad

## निर्मिती

**श्री. सच्चितानंद आफळे,**
मुख्य निर्मिती अधिकारी

**श्री. प्रभाकर परब,**
निर्मिती अधिकारी

**श्री. शशांक कणिकदळे,**
साहाय्यक निर्मिती अधिकारी

## प्रकाशक

**श्री. विवेक उत्तम गोसावी**, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी,
मुंबई-२५.

(B)

# ७. लोकप्रशासन

या प्रकरणात आपण लोकप्रशासनाचा अर्थ, लोकप्रशासनाची उत्पत्ती, त्याची भूमिका, महत्त्व आणि व्याप्ती समजून घेणार आहोत. भारतातील प्रशासकीय व्यवस्थेचा अभ्यासही या प्रकरणात करणार आहोत.

आपण काही प्रश्नांनी सुरुवात करूया. आपण राज्यशास्त्रात कशाचा अभ्यास करतो? प्रशासन म्हणजे काय? खासगी आणि सार्वजनिक प्रशासनात काय फरक आहे?

राज्यशास्त्रात राज्य आणि शासन यांचा अभ्यास केला जातो. स्थानिक, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या राजकारणाचा अभ्यास केला जातो. समाज स्वतःचे प्रशासन कसे करते हेही अभ्यासले जाते. लोकप्रशासन हा राज्यशास्त्राचा एक भाग आहे. 'कृतिशील शासन' असे आपण ज्याला म्हणू यावर लोकप्रशासनाचा भर असतो. लोकशाही पद्धतींनी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याची गरज असते. हे कार्य शासनाचे कार्यकारी मंडळ करते, त्याला लोकप्रशासन असे म्हणतात.

शासनाच्या तीन शाखा आहेत : कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ. शासनाच्या कार्यकारी मंडळाचे दोन प्रकार आहेत.

(अ) राजकीय कार्यकारी मंडळ : ज्यामध्ये निर्वाचित मंत्र्याचा समावेश असतो.

(ब) कायमस्वरूपी कार्यकारी मंडळ : नोकरशाही यांची नियुक्ती केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) इत्यादींनी आयोजलेल्या स्पर्धा परीक्षांमधून होते.

प्रशासन ही प्रक्रिया रोजच्या जीवनात सर्वत्र आढळते. प्रक्रिया म्हणून प्रशासन सार्वजनिक व खासगी दोन्ही संस्थांमध्ये दिसून येते. 'प्रशासन' या संज्ञेचा अर्थ विविध घडामोडींचे व्यवस्थापन. हे व्यवस्थापन सार्वजनिक किंवा खासगी क्षेत्रांमध्ये असू शकते. लोकप्रशासन या विषयात शासनाच्या क्रिया व प्रक्रियांचा अभ्यास केला जातो.

### लोकप्रशासनाची व्याख्या

शासनाने तयार केलेली उद्‌दिष्टे पूर्ण करण्यासाठी मानवी व भौतिक संसाधनांचे संघटन व व्यवस्थापन म्हणजे लोकप्रशासन.

लोकप्रशासनाच्या काही व्याख्या :

**हर्बर्ट सायमन :** सामान्य मान्यतेनुसार लोकप्रशासन म्हणजे राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक शासनांच्या कार्यकारी मंडळाची सर्व कार्ये.

**ड्वाईट वॉल्डो :** लोकप्रशासन म्हणजे राज्याच्या घडामोडींसाठी उपयोजन केलेली व्यवस्थापनाची कला आणि शास्त्र.

**ल्युथर ग्युलिक आणि लिंड्ल उर्विक :** लोकप्रशासन म्हणजे राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक शासनांच्या कार्यकारी मंडळाची सर्व कार्ये.

### राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन यांच्यातील परस्परसंबंध

वरील चर्चेप्रमाणे, सार्वजनिक धोरण आणि कायदे कसे तयार केले जातात याबद्‌दलचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो. या विषयात राजकीय पक्ष आणि इतर संघटना, इतर शासकीय संस्था, उदाहरणार्थ, संसद, निवडणूक आयोग इत्यादींचा अभ्यास केला जातो. लोकप्रशासन या सार्वजनिक धोरणांची व कायद्यांची अंमलबजावणी करते.

# स्वाध्याय

प्र.१ (अ) **दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. प्रशासकीय व्यवस्थेचा .......... हा कणा असतो.
(भौतिक संसाधन, मानवी संसाधन, नैसर्गिक संसाधन, भौगोलिक संसाधन)

२. POSDCORB हा संक्षेप ग्युलिक आणि .......... यांनी मांडला.
(वूड्रो विल्सन, हर्बट सायमन, उर्विक, ड्वाईट वाल्डो)

(ब) **चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

(i) कौटिल्य – अर्थशास्त्र
(ii) ॲरिस्टॉटल– द पॉलिटिक्स
(iii) मॅकियाव्हेली – रिपब्लिक

(क) **दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१. अठराव्या शतकातील जर्मनी व ऑस्ट्रिया येथील शासकीय व्यवहाराच्या पद्धतशीर व्यवस्थापनांची प्रणाली –

२. कंपन्यांनी सामाजिक आणि पर्यावरणविषयक जाणिवा सामावून घेण्याचा केलेला प्रयत्न –

प्र.२ **खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

१. प्रशासनातील पहिला टप्पा हा कर्मचारी भरतीचा असतो.

२. लोकप्रशासन या विद्याशाखेचा जन्म भारतात झाला.

प्र.३ **सहसंबंध स्पष्ट करा.**

१. खासगी प्रशासन व लोकप्रशासन
२. ग्रामीण प्रशासन व शहरी प्रशासन

प्र.४ **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**


१. प्रशासनाचे कार्य कसे चालते ते स्पष्ट करा.
२. सार्वजनिक धोरण निर्मितीचे टप्पे स्पष्ट करा.

प्र.५ **दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

लोकप्रशासनाची व्याख्या लिहून त्याची पुढील मुद्द्यांच्या आधारे व्याप्ती स्पष्ट करा.
(i) संक्षिप्त दृष्टिकोन (ii) व्यापक दृष्टिकोन

प्र.६ **दिलेल्या चित्राचे निरीक्षण करून त्याविषयी थोडक्यात लिहा.**

**POSDCORB**




**उपक्रम**

भारत सरकारच्या गृहमंत्रालयाचा अलीकडचा वार्षिक अहवाल पहा. त्यातील ठळक कार्याची नोंद करा.

***

# ८. विकास प्रशासन

या प्रकरणात आपण विकास प्रशासनाची चर्चा करणार आहोत. विकास प्रशासनाची उत्पत्ती, अर्थ, व्याप्ती आणि भारतातील विकास प्रशासनाची चर्चा करणार आहोत.

आपण काही प्रश्नांनी सुरुवात करूया. विकास म्हणजे काय? विकास प्रशासनाची गरज काय आहे? विकास प्रशासनाचा अर्थ आणि महत्त्व काय?

विकास ही एक गुंतागुंतीची संकल्पना आहे. सर्वसामान्य अर्थाने विकास म्हणजे विस्तार, बदल, वाढ किंवा सुधारणा. एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जाताना झालेली सुधारणा किंवा बदल म्हणजे विकास. हा बदल, ही सुधारणा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रांमध्ये दिसून येते. सामान्य लोक आपले आयुष्य अधिक चांगल्या प्रकारे जगू शकतील याच्याशी निगडित ही सुधारणा आहे. आधीच्या प्रकरणात आपण लोकप्रशासनाचा अभ्यास केला जे कृतिशील सरकारशी निगडित आहे. लोकप्रशासनात कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या सरकारच्या तिन्ही शाखांच्या कार्यांवर आपण लक्ष केंद्रित केले. जेव्हा लोकप्रशासन विस्तार किंवा विकासासाठी कृतिशील सरकारचा अभ्यास करते तेव्हा ते विकास प्रशासन बनते.

## उत्पत्ती आणि अर्थ

तुम्ही कल्याणकारी राज्य या संकल्पनेविषयी वाचले असेल. एखादे राज्य जेव्हा नागरिकांच्या आर्थिक व सामाजिक हिताचा पुरस्कार करण्यासाठी पुढाकार घेते, त्या राज्याला 'कल्याणकारी राज्य' असे म्हणतात. असे राज्य नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे लक्ष देते. उदा., अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला विकासाच्या संकल्पनेत कल्याणकारी राज्याला महत्त्व दिले गेले. याचा परिणाम पारंपरिक लोकप्रशासनावर झाला. शासनाच्या नियमित कार्यांपलीकडे जाऊन आता एकत्रित, संघटित आणि संचलित शासकीय कृतींतून बदल घडवण्याचे प्रयत्न सुरू झाले.

दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया आणि आफ्रिका या खंडांतील अनेक देश स्वतंत्र झाले. या नव्याने स्वतंत्र झालेल्या देशासमोर राष्ट्र उभारणीचे मोठे आव्हान होते. त्यांना शासनाने नेहमीचेच प्रशासकीय कार्य करावे असे वाटत नव्हते. विकासाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी हे देश उत्सुक होते. या देशांमधील समाज हा गुंतागुतीचा आणि विभिन्न होता आणि या देशातील अर्थव्यवस्था स्थिर होण्यासाठी झगडत होत्या. विकसित देशांनी या देशांच्या विकासासाठी केलेली मदतयोजना पुरेशी ठरली नाही. या देशांनी नवीन दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक होते. तसे झाले तरच सामाजिक असमानता, दारिद्र्य इत्यादी समस्या, त्याची आव्हाने पेलणे शक्य होणार होते. या जाणिवेतून 'विकास प्रशासन' या संकल्पनेचा उदय झाला.

या देशांतील विकास आणि बदलाचे प्रमुख स्रोत, तेथील सरकार होते. या नवीन राज्यांतील सामाजिक-राजकीय परिस्थितीमुळे विकासाच्या संकल्पनेची परिभाषा निश्चित करणे आणि पुनर्रचना करणे आवश्यक झाले. विकासाचा संपूर्णपणे नव्याने विचार झाला. विकास म्हणजे फक्त आर्थिक वाढ नाही तर सामाजिक बदल, राजकीय विकास आणि सांस्कृतिक सुधारणा देखील आहे, असा विचार मांडला गेला. त्याप्रमाणे या देशातील सरकारांनी अनेक महत्त्वाची कार्ये हाती घेतली – केंद्रीय आर्थिक नियोजन, विकास कार्यक्रम आणि प्रकल्पाची आखणी व अंमलबजावणी, औद्योगिक विकासाचे व्यवस्थापन आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांची

**Please see the following websites for further information:**

**An Overview of the Sustainable Development Goals**

NITI Aayog (National Institution for Transforming India), Government of India
http://www.niti.gov.in/content/overview-sustainable-development-goals




## स्वाध्याय

**प्र.१ दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१. नागरिकांच्या आर्थिक व सामाजिक हिताचा पुरस्कार करण्यासाठी पुढाकार घेणारे राज्य -

२. प्रशासकीय कामकाजातील दिरंगाई -

**प्र.२ पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.३ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

१. बदल आणि विस्तार यांवर आधारित दृष्टिकोनाला विकास प्रशासन म्हणतात.

२. स्वातंत्र्योत्तर भारतात शासनाने हेतुपुरस्सर सार्वजनिक क्षेत्रांमध्ये गुंतवणूक केली.

३. ७३ व्या घटनादुरुस्तीने नगरपालिकांना घटनात्मक दर्जा दिला.

**प्र.४ सहसंबंध स्पष्ट करा.**

पारंपरिक लोकप्रशासन व विकास प्रशासन.

**प्र.५ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. पारंपरिक लोकप्रशासनात समाविष्ट असणाऱ्या कोणत्याही चार क्षेत्रांची चर्चा करा.

२. नीति आयोगाची थोडक्यात माहिती लिहा.

**प्र.६ आपले मत नोंदवा.**

विकास प्रशासनात लोकसहभाग आवश्यक आहे.


**उपक्रम**

कोणत्याही एका विकास कार्यक्रमाचा विस्तृतपणे अभ्यास करा. त्याची अंमलबजावणी कशा प्रकारे झाली त्यावर वर्गात चर्चा करा.

***

# राज्यशास्त्र


## इयत्ता बारावी



UNHRC









प्रथमावृत्ती : २०२०

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.


**राज्यशास्त्र विषय समिती**

डॉ.श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
डॉ.प्रकाश पवार, सदस्य
डॉ.मोहन खडसे, सदस्य
डॉ.अभय दातार, सदस्य
प्रा.संगीता आहेर, सदस्य
प्रा.अजिंक्य गायकवाड, सदस्य
डॉ.नीता बोकील, सदस्य
श्री.मोगल जाधव, सदस्य
प्रा.गौरी कोपर्डेकर, सदस्य
सौ.वर्षा सरोदे, सदस्य-सचिव

**राज्यशास्त्र अभ्यासगट समिती**

डॉ.प्रविण भागडीकर
प्रा.संगिता दीक्षित
डॉ.राजेंद्र इंगळे
प्रा.वीणा केंची
डॉ.रोहिदास मुंढे
डॉ.व्यंकटलक्ष्मी पुरणशेट्टीवार
प्रा.अरुणा खामकर
प्रा.पीतांबर उरकुडे
प्रा.दिलीप कडू
डॉ.नंदकिशोर बोकाडे
डॉ.रामदास ढगे
डॉ.बालाजी कतूरवार
डॉ.प्रभाकर लोंढे
श्री.रविंद्र जिंदे
श्री.सुभाष राठोड
श्रीमती मुग्धा महाबळ

**संयोजक**

सौ. वर्षा सरोदे
साहाय्यक विशेषाधिकारी,
इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**लेखक**

डॉ.श्रीकांत परांजपे
डॉ.उत्तरा सहस्त्रबुद्धे
डॉ.संहिता जोशी
प्रा.अजिंक्य गायकवाड
प्रा.मानसी मिसाळ
प्रा.गायत्री लेले

**नकाशाकार**

श्री.रविकिरण जाधव

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री.देवदत्त बलकवडे

अक्षरजुळणी : मुद्रा विभाग,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

कागद : ७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह

मुद्रणादेश : N/PB/2020-21/Qty.- 0.75

मुद्रक : M/s. Shripad Vallabha Mudranalaya, Kolhapur

**निर्मिती**

श्री. सच्चितानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. प्रभाकर परब,
निर्मिती अधिकारी
श्री. शशांक कणिकदळे,
साहाय्यक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई-२५.

# ५. समकालीन भारत : सुशासन

या प्रकरणात आपण जागतिकीकरणाच्या बदलत्या काळात लोकप्रशासनाच्या बदलत्या स्वरूपाशी संबंधित सुशासन आणि नागरिक केंद्रित प्रशासन या संकल्पनांची चर्चा करणार आहोत.

आपण काही प्रश्नांनी सुरवात करूया. शासन म्हणजे काय ? प्रशासन म्हणजे काय ? नागरी जीवनात प्रशासनाची भूमिका काय असते ? नागरिकांनी प्रशासनात सहभाग घ्यावा का आणि तो कसा घ्यावा?

आपण नागरिक म्हणून प्रशासकीय यंत्रणेच्या दैनंदिन संपर्कात येतो. उदा., तुम्हांला जन्म-मृत्यूचा दाखला, आधार कार्ड, पॅनकार्ड, रेशन कार्ड इत्यादी तयार करून घ्यावे लागते. रस्त्याची दुरुस्ती न होणे, कचरा उचलला न जाणे अशा प्रकारच्या स्थानिक प्रशासनाच्या विरोधातील तक्रारी असू शकतात. नागरिकांच्या विविध प्रकारच्या मागण्या आणि गरजा यांची पूर्तता करताना प्रशासकीय यंत्रणा कशा प्रकारे प्रतिसाद देते यावर प्रशासनाचे यश-अपयश अवलंबून असते.

१९८० पासून प्रशासकीय संस्थांच्या कामगिरीवर भर दिला जाऊ लागला. प्रशासनाने योग्य प्रकारे कामगिरी करावी यासाठी उत्तरदायित्व, जबाबदारी, पारदर्शकता आणि नागरिकांचा अभिप्राय जाणून घेणे अशा बाबी लोकप्रशासनाच्या संस्थांमध्ये लागू केल्या जाण्याची आवश्यकता भासली.

राज्यसंस्थेची नागरिकांप्रती कोणती जबाबदारी असते? इयत्ता ११वी मध्ये आपण लोकप्रशासनाच्या भूमिकेविषयी चर्चा केलेली आहे. यामध्ये लोकप्रशासनाच्या दोन प्रकारच्या स्वरूपाविषयी चर्चा केलेली आहे. लोकप्रशासनाची एक भूमिका जी लोकप्रशासनाकडे मर्यादित भूमिकेतून पाहते (ज्याला POSDCORB म्हणतात) आणि दुसऱ्या व्यापक भूमिकेत शासनाच्या तीनही शाखांचा विचार आपण करतो.

विकास प्रशासनाच्या संकल्पनेमुळे लोकप्रशासनाच्या पारंपरिक भूमिकेत कसा बदल घडवून आणला ते आपण पाहिले. विकासाभिमुख प्रशासनानुसार लोकप्रशासनातील नागरिकांची भूमिका महत्त्वाची असते हेही आपण पाहिले.

आज शासनाव्यतिरिक्त अनेक बिगरशासकीय घटक, स्वयंसेवी संस्था या लोकप्रशासनासाठी साहाय्यकारी भूमिका बजावताना दिसतात. लोकप्रशासनातील शासकीय संस्था आणि बिगरशासकीय संस्था यांच्या अशा सहकार्यात्मक प्रयत्नांचे वर्णन म्हणजे 'प्रशासन' होय. हा लोकप्रशासनाकडे बघण्याचा व्यापक दृष्टिकोन आहे. म्हणजेच प्रशासन ही शासनापेक्षा व्यापक संकल्पना आहे. यामध्ये शासनाच्या केवळ औपचारिक शाखाच (उदा., कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ, नोकरशहा) नाहीत तर अनौपचारिक शाखा (उदा., बिगरशासकीय संस्था, नागरी समाज, खासगी संस्था) यांचाही समावेश केला जातो. प्रशासनाच्या संकल्पनेचे उद्दिष्ट नागरिकांवर लक्ष केंद्रित करून सार्वजनिक संस्थांची कामगिरी सुधारणे हे आहे.

**करून पहा.**


तुमच्या परिसरात/शहरात/राज्यात कार्य करणाऱ्या बिगर राजकीय संघटना शोधा. त्या कोणत्या समस्यांवर काम करत आहेत ते बघा. कोणत्या संघटनेत तुम्हांला काम करायला आवडेल?

### उत्पत्ती आणि अर्थ

१९९० च्या दशकात जगभरात अनेक बदल झाले त्यांतील काही पुढीलप्रमाणे :

(i) **जागतिक अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण :** जागतिकीकरणाचे अनेक पैलू आहेत - (अ) दूरसंचार क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे इंटरनेट, मोबाइल संपर्कयंत्रणा, टीव्ही यांत विकास झाला आणि सोशल नेटवर्किंगमुळे (सामाजिक

**प्र.२ (अ) संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**(ब) चूक की बरोबर सकारण लिहा.**

(१) राजकीय कार्यकारी प्रमुखांविरोधात लोकायुक्त चौकशी करू शकतात.

(२) सुशासनामध्ये नैसर्गिक संसाधनांचा कुशलतेने वापर केला जातो.

**प्र.३ सहसंबंध स्पष्ट करा.**

सुशासन आणि ई-प्रशासन

**प्र.४ तुमचे मत नोंदवा.**

(१) ई-प्रशासनामुळे शासकीय प्रक्रिया जलद झाली.

(२) ई-प्रशासनाने प्रशासनाला जनतेच्या जवळ आणले आहे.

**प्र.५ उत्तर लिहा.**

समाजातील विविध घटकांचे हक्क सुरक्षित करणाऱ्या भारतातील विविध संस्था स्पष्ट करा.

**प्र.६ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

सुशासनाची पुढे दिलेली मूल्ये सविस्तरपणे स्पष्ट करा.

(अ) सहभागात्मक (ब) पारदर्शकता

(क) प्रतिसादात्मक (ड) उत्तरदायित्व

**उपक्रम**

(१) समाजातील विविध घटकांचे हक्क सुरक्षित करणाऱ्या राज्यस्तरावरील आयोगांची माहिती संकलित करा.

(२) 'ऑम्बुडसमन'विषयी माहिती संकलित करा.